संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

---

# खऱ्या संतांचा चमत्कारावर नव्हे; तर कृतीवर विश्वास होता - डॉ. प्रदीप विटाळकर

## ग्रामगीता व्याख्यानमालेतून सूर

अमरावती. -

भारताला फार मोठी संत परंपरा लाभली आहे. पण खरे संत कोण आणि ढोंगी कोण हे ओळखण्याचा विवेक सर्वसामान्यांना असायला पाहीजे. देवाच्या नावावर सगळीकडे बाजार झालेला दिसतो. या देशात अनेक संत होवून गेलेत, खऱ्या संतांचा कधीच चमत्कारावर विश्वास नव्हता, कर्मयोगी संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा कर्मावर विश्वास होता. नितिमत्तेचा आदर्श या संतांनी समाजासमोर ठेवला, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. प्रदीप विटाळकर यांनी केले. प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वे या ठिकाणी संपन्न झाले, 'संत आणि चमत्कार' या विषयावर मांडणी करतांना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन विद्यापीठाच्या प्रभारी हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ. मोना चिमोटे यांनी अध्यक्षीय भाषण केले. व्यासपीठावर धामणगांव एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री प्रदीपकुमार लुणावत, प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाय.बी. गांडोळे, आचार्य हरिभाऊ विरुळकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

डॉ. विटाळकर विषयाची मांडणी करतांना म्हणाले, संत सर्वगुण संपन्न असतात. खरे संत सिद्धीच्या मोहामध्ये पडत नाहीत, ते कधीच चमत्कार करीत नाही. संतांनी कधीही कुठलीही अपेक्षा समाजाकडून बाळगली नाही, तर सदैव संतांनी साहित्याच्या, विचाराच्या, कृतींच्या व प्रबोधनाच्या माध्यमातून समाजाला सुदृढ करण्याचा प्रयत्न केला आहे. दासबोधातून संतांचे वर्णन केले आहे. अज्ञानाचा फायदा घेवून बाबा चमत्कार करतात. दुबळी, पांगळी माणसे त्याला बळी पडतात. देवाच्या नावावर बाजार करणाऱ्या आणि चमत्कार करणाऱ्यांवर राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून कडाडून हल्ला चढविला.

स्वार्थ, लोभी, वासना, व्यभिचार असलेले बाबा दिवसेंदिवस निर्माण होत आहे. त्यांना लोकांकडूनच खतपाणी घातल्या जाते. अखिल भारतीय आखाडा परिषदेने चौदा बोगस बाबांची नावे घोषित केल्याची माहितीही त्यांनी याप्रसंगी दिली. राष्ट्रसंतांनी मूल्यदृष्टी, तत्वदृष्टी स्वीकारा, बुद्धीला लागलेला अंधश्रद्धेचा गंज काढून टाका, देव प्रत्येकाच्या कर्मात असतो, स्वतःच्या बुद्धीवर विश्वास ठेवा, आळस आणि अंधश्रद्धेमुळे माणसे फसतात, असा उपदेश केला. माणूसकीच्या पातळीवर जाण्याचा प्रत्येकांनी प्रयत्न करावा, असेही संतांनी सांगितल्याचे ते म्हणाले.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ.वाय.बी. गांडोळे, मनोगत श्री मधुभाऊ घारड व श्री प्रदीपकुमार लुणावत यांनी, संचालन प्रा. जितेंद्र बारळकर व प्रा. निलेश मोहोकार यांनी, तर आभार डॉ. दिपक श्रृंगारे यांनी मानले.

## द्वितीय पुष्प

प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प मातोश्री सुभद्राबाई पाटील कला व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशिम या ठिकाणी संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. मनोज तायडे यांनी अध्यक्षीय भाषण केले. व्यासपीठावर ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक संस्था, मानोराचे अध्यक्ष श्री अरविंद पाटील इंगोले, सचिव श्री महादेव ठाकरे, प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, आचार्य हरिभाऊ विरुळकर जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एन. ठाकरे, व्यवस्थापनाचे पदाधिकारी उपस्थित होते.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ.एस.एन. ठाकरे, मनोगत श्री मधुभाऊ घारड, संचालन करीत आभार प्रा.एस.पी. रिठे यांनी मानले. व्याख्यानाला राष्ट्रसंतांचे भाविक भक्त, शहरातील नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, जनसंपर्क विभाग

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ३१/०८/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी